# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/11/2022 (बुधवार) सायंकाळ

---

## खुन करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :— दिनांक ०७/१२/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे—सौ. पंचशिला अनिल रामटेके, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ बोरी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे अप. क्र. ६८५/२०१७ कलम ३०२, ४०४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०६/१२/२०१७ चे २०.०० वा. फिर्यादीची मृतक मुलगी व आरोपी नामे—श्याम शिवरोपन नारायण, वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं. ०१ बुट्टीबोरी हे पति—पत्नी असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपीने घरगुती कारणावरून आपल्या पत्नीला तिचे राहते घरात असलेल्या कापडी ओढणीने गळा आवळुन खुन केला होता. अशा फिर्यादीच्या तोंडी रीपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचे तपास उपविभागीय पोलीस अधिकारी मराठे नागपूर विभाग यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ०९/११/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. पास्कर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास व ५०,०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ०३ वर्ष सश्रम कारावास आणि १०,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०२ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. फाजी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार अनिल व्यवहारे, ब. नं. ६२० पोलीस स्टेशन बोरी यांनी मदत केली आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

पो.स्टे. देवलापार :– दिनांक ०९/११/२०२२ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा मोरफाटा दर्गा एन ४४ रोड या मार्गावर काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन दिनांक ०९/११/२०२२ चे ०८.०० वा. ते ०९.०० वा. चे सुमारास अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा मोरफाटा दर्गा एन ४४ रोड येथे देवलापार पोलीस पथकाने नाकाबंदी केली असता यातील आरोपी टाटा कंपनीचा आयसर ट्रक क्रमांक एम एच– ४०/सी. डी.–६४९१ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहनात जनावरे अतिशय आखुड नायलॉन दोराने बांधुन एकावर एक रचुन जनावरांची कोणतीही बसण्याची व चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करीत असताना मिळुन आल्याने यातील फिर्यादी व पोलीस स्टेशन देवलापार पोलीस पथकाने पेट्रोलींग दरम्यान सदर वाहनाचा पाठलाग करीत असता यातील वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन हे मौजा मोरफाटा दर्गा समोर वाहन सोडुन जंगलाचा फायदा घेवुन पळुन गेल्याने सदर वाहनाची पाहणी केली असता काळया, पांढऱ्या, लाल रंगाच्या, कोश्या रंगाच्या अशा एकुण १८ गोवंश गायी प्रत्येकी गाय १००००/– रू. प्रमाणे एकुण किमती १८००००/– रू. तसेच काळया पांढऱ्या रंगाचे एकुण ०५ बैल प्रत्येकी कीमती १०,०००/– रू. प्रमाणे ५०,०००/–रू. एक टाटा कंपनीचा आयसर क्रमांक एम एच ४० सी. डी. ६४९१ कीमती अंदाजे १००००००/–रू. आखुड तुटलेले दोरखंड एकुण किमती ००.००रू. असा एकुण १२,३०,०००/–रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक संदीप नागोसे ब नं १९७४ पोलीस स्टेशन देवलापार यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१ ), (घ), (ड), (च) प्राणी छळ. अधिनियम सहकलम (५), (अ) ९, महाराष्ट्र प्राणी संरक्षण .कायदा सहकलम १८४, १७९ मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन देवलापार करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**